।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229294
**EXAMINATION DEPARTMENT**
Website: srtmun.ac.in
Fax : (02462) 229572
e-mail:directorboee@srtmun.ac.

संदर्भ : परीक्षा/कला/२०१९-२०/९९०५ दिनांक : ०२/०८/२०१९

## सुधारीत सूचना

### हिवाळी २०१९ च्या परीक्षेसाठी आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना :

**अभ्यासक्रमाचे नांव :** BA, BCom., B.Sc., BBA, BVoc-all, BSW, BA (Animation), BA (Lalitkala), BA (MCJ), BA (Rural Mgt), BA (Fashion Design/FFD), BA (Admins Services), BA (Interdispalnary)-FY, SY, TY, B.Sc. (FT, BT, HS, CS, IT, FS, BC, BI, SE, NT)

वर्षिक अभ्यासक्रम (१००, ८०:२०), सत्रपध्दती अभ्यासक्रमातील (४०:१०Theory), (२५:१५ Theory), या सर्व अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण ATKT व F-ATKT विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या तीनपेक्षा जास्त संधी संपल्यामुळे व दिनांक १७.०५.२०१६ व दिनांक ०७.१२.२०१० च्या परीपत्रकानुसार वरील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना (सर्व विषयासाठी, प्रात्यक्षिक व अंतर्गत गुणांसह) नवीन सत्र पध्दती CBCS अभ्यासक्रमानुसार संपुर्ण विषयासाठी परीक्षा आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे. तसेच प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष CGPA नंतर CBCS अभ्यासक्रम लागू करण्यांत आलेला आहे. CGPA च्या काही विषयाच्या अभ्यासक्रमात बदल असल्यामुळे CGPA विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तीन संधी देवून त्यानंतर अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना (अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा) नवीन CBCS अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा देणे अनिवार्य राहील.

CGPA अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना (BA, B.Com, B.Sc) चतुर्थ सत्रासाठी उन्हाळी-२०१९ ही CGPA प्रमाण परीक्षा देण्याची शेवटची संधी होती. पाचव्या सत्रासाठी हिवाळी-२०१९ व सहाव्या सत्रासाठी उन्हाळी-२०२० ही CGPA अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा देण्याची शेवटची संधी राहील. उर्वरीत प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण राहीलेल्या विषयाची परीक्षा CBCS अभ्यासक्रमाप्रमाणे देता येईल.

०१. विद्यार्थ्यांनी संबंधीत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाच्या तारखा :

अ. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कासह दिनांक २६.०८.२०१९ पर्यंत आवेदनपत्र स्वीकारावेत.
ब. दिनांक २७.०८.२०१९ ते दिनांक ३१.०८.२०१९ पर्यंत रू. १००/- विलंब शुल्क आकारून परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात स्विकारावेत व मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या तारखेस महाविद्यालयांनी विद्यापीठात आवेदनपत्र सादर करावेत.
क. दिनांक ०१.०९.२०१९ पासून ते १४.०९.२०१९ पर्यंत प्रतिदिन रू ५०/- अतिविलंब शुल्क आकारून परीक्षा आवेदनपत्र केवळ **परीक्षा विभागात स्वीकारले** जातील. अतिविलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने स्विकारू नयेत. दिनांक १४.०९.२०१९ नंतर विद्यार्थ्यांचे विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागास पाठवू नयेत.
ड. SEC (कौशल्य विकास) साठी द्वितीय व तृतीय वर्षासाठी प्रति सत्र रू ५०/- परीक्षा शुल्क आकारून ती फिस महाविद्यालयात ठेवावी.
इ. सर्व अभ्यासक्रमासाठी परीक्षा शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी दिनांक २६.०७.२०१८ रोजी निर्गमित केल्याप्रमाणे तेंच शुल्क आकारण्यांत यावेत.

०२. महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क NEFT/RTGS ई-पेमेंटद्वारे अभ्यासक्रम निहाय जसे की BA, B.Sc., B.A. (MCJ) असे विद्याशाखानिहाय मा.वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नांवे दिनांक **०४.०९.२०१९** किंवा त्या पुर्वी IDBI बॅकेच्या खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे जमा करणे आवश्यक आहे. विहीत तारखेनंतर जमा केल्यास १० दिवसापर्यंत प्रतीदिन रू. ५००/- तर १० दिवसानंतर प्रतिदिन रू. १०००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

NEFT द्वारे परीक्षा शुल्क भरतांना अभ्यासक्रमनिहाय भरावे, अन्यथा परीक्षा आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत. तसेच धनाकर्ष किंवा NEFT/RTGS विद्याशाखानिहायच काढावा, अतिरिक्त असलेली रक्कम वर्ग केली जाणार नाही, त्यामुळे अतिरिक्त रक्कमेचा धनाकर्ष काढू नये.

**Mode of Payment : e-payment :**

a) Payment through RTGS/NEFT :
Name of the A/C holder-**Finance & Accounts Officer, S.R.T.M.University, Nanded.**
Name of Bank : **IDBI Bank, Lahoti Complex, Vazirabad, Nanded,**
IFSC Code : **IBKL0000500, A/C Number 500104000028422**

०३. आय.यु.एम.एस. अंतर्गत परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन स्वीकारण्याची कार्यवाही चालू आहे. ही कार्यप्रणाली पूर्णत्वास आली तर परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन स्वीकारण्यात येतील व तसे स्वतंत्र परीपत्रकान्वये कळविण्यांत येईल. ही कार्यप्रणाली पूर्णत्वास न आल्यास नेहमी प्रमाणे ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यांत येतील. महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र स्वीकारून विहित शुल्काचा RTGS / NEFT / e-payment द्वारे भरल्याची पावतीसह परीक्षा विभागात तसेच परभणी व लातूर उपकेंद्रामध्ये सादर करण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | जिल्हा | | महाविद्यालय क्रमांक | तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | परीक्षा विभाग प्रस्तुत विद्यापीठ | १०१ ते १२१ | ०५.०९.२०१९ |
| ०२ | नांदेड | | १२२ ते उर्वरित सर्व महाविद्यालये | ०६.०९.२०१९ |
| ०३ | परभणी/हिंगोली | परभणी उपकेंद्र | २०१ ते २१४ | ०५.०९.२०१९ |
| ०४ | परभणी/हिंगोली | | २१५ ते उर्वरित सर्व महाविद्यालये | ०६.०९.२०१९ |
| ०५ | लातूर | लातूर उपकेंद्र | ३०१ ते ३१४ | ०५.०९.२०१९ |
| ०६ | लातूर | | ३१५ ते उर्वरित सर्व महाविद्यालये | ०६.०९.२०१९ |

(वरील प्रमाणे परभणी व लातूर उपकेंद्र प्रमुखांनी सर्व परीक्षा आवेदनपत्र दिनांक ०७.०९.२०१९ रोजी परीक्षा विभागात सादर करावेत.)

०४. विहीत तारखेस परीक्षा आवेदनपत्र सादर न केल्यास महाविद्यालयास प्रती विद्यार्थी प्रतीदिन रु २/- किंवा रु १०००/- या पैकी जे जास्त असेल तो विलंब शुल्क आकारण्यांत येइल.

०५. परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठ प्रकाशन विभागात प्रति आवेदनपत्र रू.०५/- भरून घ्यावेत. अथवा विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून (www.srtmun.ac.in) डाऊनलोड करून घेता येईल. जे विद्यार्थी सदर आवेदनपत्र संकेतस्थळावरून घेतील त्यांच्याकडून परीक्षा आवेदनपत्र शुल्क ०५/- अधिकचे भरून घ्यावेत.

०६. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी स्वतंत्र परीक्षा आवेदनपत्र भरण्यात यावे. वरील आवेदनपत्र महाविद्यालयांनी खास दुतामार्फतच पाठवावीत, पोष्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले परीक्षा आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत.

०७. विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रूटी जसे की पात्रता क्रमांक, राखीव निकाल, प्रशासकीय कारणास्तव राखीव निकालाच्या पुर्ततेसाठी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीने विद्यापीठात संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी. **कोणत्याही परिस्थीतीत विद्यार्थ्यांना परीक्षा विभागात पाठवू नयेत.**

०८. (ATKT / FATKT) विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी / पूर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केलेला असेल तरीही सदरील विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र सादर करणे आवश्यक आहे. पुर्नमूल्यांकनाचा निकाल जाहीर झाला नाही या सबबीखाली कुठल्याही परिस्थितीत परीक्षा आवेदनपत्र विहित तारखेनंतर स्वीकारले जाणार नाहीत.

०९. विना अनुदानीत महाविद्यालयांनी दिनांक २६.०७.२०१९ रोजीच्या परीपत्रकानुसार विषय निहाय/अभ्यासक्रम निहाय प्राध्यापकांच्या यादीची प्रत परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना जोडणे आवश्यक आहे.

१०. ज्या महाविद्यालयात विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य व प्राध्यापक यांची नेमणूक केलेली नाही अशा महाविद्यालयांना परीक्षेचे केंद्र दुसऱ्या महाविद्यालयात देण्यांत येईल. त्यामुळे अशा महाविद्यालय प्रशासनातर्फे परीक्षा केंद्राचे शुल्क प्रति विद्यार्थी रु १५०/- NEFT / RTGS ई-पेमेंटद्वारे अदा केल्यानंतरच हिवाळी २०१९ परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात स्वीकारता येतील. परीक्षा केंद्राचे शुल्क विद्यार्थ्यांकडून घेऊ नयेत तसे आढळून आल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

तरी वरील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी :
१. मा. वित व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक, परभणी व लातूर उपकेंद्र
३. सर्व अधिक्षक, संबंधित विद्याशाखा, परीक्षा विभाग.

G:\GMK Exam\WINTER-19\Exam Fees Shedule-W-19.docx